"SNA-SPARSH" कार्यपध्दतीच्या प्रयोजनार्थ केन्द्र पुरस्कृत योजनांतर्गत -"UNDP LDN EAP Project (९१५३)" या योजनेकरीता (MH-७३२) समन्वय अधिकारी तसेच एकल समन्वय यंत्रणा व आहरण व संवितरण अधिकारी नियुक्ती करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**वन विभाग**

**शासन निर्णय क्र. साववि-२०२५/प्र.क्र.६६/वने-११**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : ०३ ऑगस्ट, २०२६.

**वाचा :**

१) भारत सरकार वित्त मंत्रालय यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र.F.No.१(१३)/PFMS/FCD/२०२०, दिनांक २३.०३.२०२१.

२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र.३५/कोषाप्रशा-४, दि.०१.०७.२०२१.

३) भारत सरकार, वित्त मंत्रालय, वित्त विभाग, सार्वजनिक वितीय व्यवस्थापन प्रणाली विभाग यांचे कार्यालयीन ज्ञापन क्र.F.No.१ (२७)/PFMS/२०२०, दि. १३.०७.२०२३.

४) भारत सरकार वित्त मंत्रालय, व्यय विभाग, सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली विभाग यांचे, कार्यालयीन पत्र क्र. F.No.१ (२७)/PFMS/२०२०,दि.१०/०६/२०२५

५) वेतन आणि लेखा कार्यालय, भारत सरकार पर्यावरण, वने आणि हवामान बदल मंत्रालय, पर्यावरण भवन, नवी दिल्ली यांचे कार्यालयीन पत्र क्र. F.No.PAO/MOEF&CC/PFMS/On boarding SNA SPARSH/२०२५-२६, दि.१६/०६/२०२५

६) वित्त विभागाच्या परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२४/प्रक्र.५१/कोषा प्रशा-४, दि. ११/१०/२०२४

७) वित्त विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२५/प्रक्र.४४/कोषा प्रशा-४, दि. १८/०६/२०२५

८) महसुल व वन विभाग शासन निर्णय क्र. एफडीएम २०२५/प्र.क्र.५३/वने-२, दि. ०९/०९/२०२५

९) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१/सी/यो/प्र.क्र.२६/९४/२४-२५, दिनांक ०७.०७.२०२६.

**प्रस्तावना :**

केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागाने वाचा क्र.३ येथील ज्ञापनान्वये, केंद्र शासन व राज्य शासन या दोन्ही स्तरावरील रोख व्यवस्थापनामध्ये अधिक परिणामकारकता साधण्यासाठी सार्वजनिक वितीय व्यवस्थापन प्रणाली (PFMS), राज्याची एक एकात्मिक वितीय व्यवस्थापन माहिती प्रणाली (State IFMIS) आणि भारतीय रिजर्व रिझर्व्ह बँकेची ई-कुबेर प्रणाली यांच्या एकात्मिक रचनेच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत योजनांचा निधी वितरित करण्यासाठी "SNA-SPARSH" (समयोचित प्रणाली एकीकृत शीघ्र हस्तांतरण - Real Time System of Integrated Quick Transfers) ही पर्यायी निधी प्रवाह कार्यपद्धती प्रस्तावित करण्याचा निर्णय घेतला आहे.

वाचा क्र.४ येथील पत्रान्वये, भारत सरकार, वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागाने, १ नोव्हेंबर २०२५ पासून सर्व केंद्र पुरस्कृत योजनांची SNA-SPARSH प्रणालीव्दारे अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे कळविले आहे. भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाच्या व्यय विभागाच्या निर्देशास अनुसरुन, "SNA-SPARSH" अंतर्गत केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या संबधित विभागाने भारतीय रिझर्व्ह बँक येथे राज्य संलग्नित योजना (State linked schemes) निहाय स्वतंत्र आहरण खाते (Drawing Account) उघडणे अनिवार्य आहे.

वाचा क्र.६ येथील परिपत्रकान्वये राज्य शासनाच्या वित्त विभागाने सदर बैंक खाते उघडण्याकरीता अनुसरावयाची कार्यपद्धती निश्चित केली आहे. वाचा क्र.७ येथील शासन निर्णयान्वये, वित्त विभागाने महाराष्ट्रात अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या केंद्र पुरस्कृत योजना "SNA-SPARSH" कार्यप्रणाली अंतर्गत ऑनबोर्डिंग करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने प्रत्येक राज्य संलग्नित योजनांसाठी भारतीय रिझर्व्ह बँक येथे एक स्वतंत्र आहरण खाते उघडणे आवश्यक आहे.

तसेच वाचा क्र.८ येथील शासन निर्णयान्वये, केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत सर्व राज्य संलग्नित योजनांकरीता (SLS- State link Scheme) उपलब्ध होणारा निधी सायबर कोषागार कार्यालयातून (कोषागार संकेतांक-८१०१) देयकाव्दारे आहरीत करण्यासाठी "विभागीय वन अधिकारी (रोहयो), प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय (८१०१४६०००२) या पदास आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात आले आहे.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे वन विभागामार्फत राबविण्यात येणा-या UNDP LDN EAP Project (९१५३) या केंद्र पुरस्कृत योजनेकरीता (State link Scheme) भारतीय रिझर्व बँक येथे स्वतंत्र आहरण खाते उघडणे आवश्यक आहे. तसेच वित्त विभागाने सदर बँक खाते उघडण्यासाठी अनुसरावयाच्या कार्यपद्धती विचारात घेऊन, "SNA-SPARSH" कार्यपद्धतीच्या प्रयोजनार्थ प्रत्येक राज्य संलग्नित योजनेसाठी भारतीय रिझर्व बँक येथे स्वतंत्र आहरण खाते उघडणे, समन्वय अधिकारी तसेच एकल समन्वय यंत्रणा यांची नियुक्ती करणे व आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

वन विभागामार्फत राबविण्यात येणा-या **"UNDP LDN EAP Project (९१५३)"** या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत MH ७३२ या राज्य संलग्नित योजनेकरीता (State link Scheme) **भारतीय रिझर्व बँक येथे स्वतंत्र आहरण खाते उघडण्यास मान्यता देण्यात येत आहे.** याअनुषंगाने पुढील कार्यवाही तात्काळ करण्यात यावी.

तसेच "SNA SPARSH" या कार्यपद्धतीच्या प्रयोजनार्थ खालीलप्रमाणे राज्य संलग्नित योजनानिहाय **समन्वय अधिकारी तसेच एकल समन्वय यंत्रणा यांची नियुक्ती करण्यात येत आहे.**

| अ. क्र. | केंद्र पुरस्कृत योजनेचे नाव | PFMS Code | राज्य संलग्नित योजनेचा संकेतांक (SLS Code) | समन्वय अधिकारी | एकल समन्वय यंत्रणा |
|---|---|---|---|---|---|
| १ | UNDP LDN EAP Project (९१५३) | ९१५३ | MH ७३२ | सह / उप सचिव (वने), महसूल वन विभाग, मंत्रालय, मुंबई. | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) म.रा. नागपूर. |

SNA-SPARSH प्रणालीच्या प्रयोजनार्थ "UNDP LDN EAP Project (९१५३)" या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत MH ७३२ या राज्य संलग्नित योजनेकरीता (State link Scheme) उपलब्ध होणारा निधी सायबर कोषागार कार्यालयातून (कोषागार संकेतांक-८१०१) देयकाव्दारे आहरीत करण्यासाठी **"विभागीय वन अधिकारी (रोहयो), प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर** यांचे कार्यालय (८१०१४६०००२)" यांची आहरण व संवितरण अधिकारी घोषित करण्यात येत आहे.

**<u>समन्वय अधिकारी :-</u>** समन्वय अधिकारी हे त्यांच्या अधिनस्त असलेल्या कार्यासनामार्फत राबविल्या जाणा-या केंद्र पुरस्कृत योजना, सार्वजनिक वितीय व्यवस्थापन प्रणालीवर "SNA-SPARSH" मार्फत राबविण्याच्या दृष्टीने समन्वयाचे काम करतील.

**<u>एकल समन्वय यंत्रणा :</u>** केंद्र शासन तसेच राज्य शासन यांचेमार्फत केंद्र पुरस्कृत योजनांची सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणालीवर "SNA-SPARSH" मार्फत अंमलबजावणी करण्याकरिता निर्गमित केलेल्या केंद्र पुरस्कृत योजनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन एकल समन्वय यंत्रणा यांनी आवश्यकतेनुसार तात्काळ कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५१/कोषा प्रशा-४ दि.१०.१०.२०२४ व शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.५१/कोषा प्रशा-४, दि.११.१०.२०२४ अन्वये निर्गमित केलेल्या व वेळोवेळी निर्गमीत करण्यात येणा-या मार्गदर्शन सूचनांस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्रमांक २०२६०८०३१६२९०७०८४० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार नावाने,

PRATAP RAJENDRA SATPUTE

Digitally signed by PRATAP RAJENDRA SATPUTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=46e55cdbf3321ecaa0de879cc768619afcdbda90e6691b3baf2255384355942f, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=47A54DFAE5D873AD7624C29CACBF61D571ADA2CBEECE334AB2E56A179C9FF19F, cn=PRATAP RAJENDRA SATPUTE
Date: 2026.08.03 16:30:13 +05'30'

**( प्रताप राजेंद्र सातपुते )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
४) महालेखापाल (लेखापरीक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर.
५) आयुक्त (लेखा व कोषागरे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) संचालक (लेखा व कोषागारे),नवीन प्रशासकीय भवन मंत्रालय, मुंबई.
७) उप संचालक, महाराष्ट्र राज्य सायबर कोषागार कार्यालय, मुंबई.
८) सहसंचालक (सुधारणा) संचालनालय, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन,मंत्रालय, मुंबई.
९) वित्त विभाग (व्यय -२/अर्थ-१३/कोषा प्रशा-४ व ५), मंत्रालय, मुंबई.
१०) उप महाप्रबंधक, डिजिटल आणि लेनदेन बँकींग शासकिय व्यावसायीक विभाग, सायनारजी सी६/ जी ब्लॉक बांद्रा-कुला कॉम्पप्लेक्स, वाद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.
११) राज्य नोडल अधिकारी, पीएफएमएस, एव्हरेस्ट कॉम्पप्लेक्स, मरीन लाईन्स, मुंबई.
१२) कार्यासन अधिकारी (वने-२), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१३) कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्पिय), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४) उप सचिव/अवर सचिव (सर्व), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१५) निवडनस्ती (वने-११)